# यावल महाविद्यालयास सिनेट सदस्य यांची सदिच्छा भेट

यावल (प्रतिनिधी)- येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे सिनेट सदस्य प्रा. डॉ. केदारनाथ कवडीवाले (दोंडाईचा महाविद्यालय) यांनी सदिच्छा भेट दिली.

यात सिनेट सदस्य डॉ. कवडी वाले यांनी यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव मार्फत विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. यात त्यांनी G- 20 युवा संवाद@ 2047 राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यापीठात सदर कृती आराखड्याच्या अनुषंगाने पंचप्रण 1. विकसित भारत, 2. गुलामीच्या सर्व खुणा पुसून टाका, 3. आपल्या वारसाचा अभिमान बाडगा, 4. एकतेचे सामर्थ्य व 5. नागरिकांचे कर्तव्य हे गुण युवकांमध्ये राबवणे हा उद्देश असून, भारताच्या पंचप्रण - एक युवा संवाद, भारत के पंचप्रण- एक युवा परिचय या थीमवर विद्यापीठात शनिवार दिनांक 22 जुलै 2023 रोजी होणाऱ्या कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सिनेट सदस्य यांचा सत्कार करण्यात आला. यात संस्थेचे संचालक श्री सुनील भोईटे व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात डॉ. पी. व्ही. पावरा, प्रा. मनोज पाटील, प्रा. संजीव कदम, प्रा. अरुण सोनवणे, प्रा. सी. के. पाटील, प्रमोद भोईटे आदी उपस्थित होते.



# यावल महाविद्यालयास सिनेट सदस्यांची भेट

▶▶ **यावल । प्रतिनिधी–** येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे सिनेट सदस्य श्री. नरेंद्र नारखेडे यांनी सदिच्छा भेट दिली.

यात सिनेट सदस्य श्री नरेंद्र नारखेडे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव मार्फत विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. यात त्यांनी G- २० युवा संवाद २०४७ याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सिनेट सदस्य यांचा सत्कार करण्यात आला. यात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए.पी. पाटील प्रा. एम. डी. खैरनार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात जळगाव येथील नूतन मराठा महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. हेमंत येवले, किमान कौशल्य विभागाचे प्रा. मुकेश येवले, डॉ. एस. पी. कापडे, डॉ. एच. जी. भंगाळे, डॉ. आर. डी. पवार डॉ. पी. व्ही. पावरा आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्री मिलिंद बोरघडे, श्री संतोष ठाकूर, श्री रमेश साठे, डी. डी. पाटील यांनी परिश्रम घेतले.